सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Website-https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/९३२/२०२३ दि: ०३.०७.२०२३

**प्रति,**

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:- केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत पूर्ण घरकुलांवर योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह/लोगो) लावणेबाबत.**

**संदर्भ:-** १) उप सचिव (केंद्रीय योजना), ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक-प्रआयो-२०२१/प्र.क्र.३७/यो-१० दिनांक ३ एप्रिल २०२३.
२) राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/६०/२०२३ दिनांक ३ एप्रिल २०२३.
३) ग्राम विकास विभाग यांचेकडील ज्ञापन क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.३७/यो-१० दि.१६.०६.२०२३

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत पूर्ण घरकुलांवर योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह) लावणेबाबत ग्रामविकास विभाग यांचेकडून संदर्भ क्र.१ अन्वये कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

आता ग्राम विकास विभाग यांचेकडील ज्ञापन संदर्भ क्र.३ अन्वये प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांवर योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह) लावणेबाबत आपलेस्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

तथापि, राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत घरकुलांवर योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह) लावणेबाबत संदर्भ क्र. २ अन्वये आपलेस्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- संदर्भीय पत्रे

**डॉ. राजाराम दिघे**
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत:**

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीसाठी.
३. उप सचिव (केंद्रिय योजना), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
४. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

CamScanner

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

Email ID : sangeeta.kholgadge@nic.in दूरध्वनी क्र .०२२-२२०६०५६८

क्रमांक : -प्रआयो-२०२१/प्र.क्र.३७/योजना-१० दिनांक:- ३ एप्रिल, २०२३.

प्रति,

संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,
बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

विषय : -प्रधानमंत्री आवास-योजना ग्रामीण अंतर्गत पुर्ण झालेल्या घरकुलांसाठी योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह) लावणेबाबत.

संदर्भ :- १. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे पत्र जा.क्र.राव्यक-ग्रागृ/बांधकाम/२०२३/२३६५.दि.१६.०३.२०२३

२. क्र.इंआयो-२०१४/प्र.क्र.४१/योजना-१०, दि.२०.०५.२०१४ चे शासन पत्र.

३. क्र.प्रआयो-२०१८/प्र.क्र.३९३/योजना-१०, दि.२२.०३.२०१८ चे शासन पत्र.

विषयांकित प्रकरणी आपल्या उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन कळविण्यात येते की, प्रधानमंत्री आवास-योजना ग्रामीण अंतर्गत पुर्ण झालेल्या घरकुलांसाठी योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह) लावण्याबाबत यापूर्वी शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भीय दिनांक २०.०५.२०१४ व दि.२२.०३.२०१८ रोजीच्या पत्रांस अनुसरुन कार्यवाही करण्यात यावी.

२. या बाबींवरील होणारा खर्च प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत जिल्हास्तरीय प्रशासकीय खर्चामधून करण्यात यावा.

(कृ.मा.प.)

CamScanner

३.    तसेच, शबरी व रमाई आवास योजना या योजनेंतर्गत घरकुलांवर परिचय चिन्ह लावण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

( मनोज जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- निवड नस्ती, का.योजना-१०, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

CamScanner

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Website-https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/६०/२०२३ दि: ०३.०४.२०२३

**प्रति,**

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:-केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत पूर्ण घरकुलांवर योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह/लोगो) लावणेबाबत.**

**संदर्भ:-** १) राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडील पत्र क्र. राव्यक-ग्रागृ/बांध/१३३० दिनांक २३ मार्च २०१८.
२) रमाई आवास योजनेबाबत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडील पत्र क्र. राव्यक-ग्रागृ/बांध/२९३१ दिनांक ०४ जानेवारी २०१९.
३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: घरकुल-२०१९/प्र.क्र.१००/का.१७ दिनांक २१ नोव्हेंबर २०२२.
४) उप सचिव (केंद्रीय योजना), ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक-प्रआयो-२०२१/प्र.क्र.३७/यो-१० दिनांक ३ एप्रिल २०२३.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ च्या शासन आदेशान्वये, राज्यातील केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना व आदिम आवास योजना अंतर्गत पूर्ण घरकुलांवर योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह/लोगो) लावणेकरिता संदर्भ क्र. १ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हास्तरावरून सर्व योजनांकरिता ई-निविदा पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तरी या सुचनांनुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. **प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण-** संदर्भ क्रमांक १ व ४ अन्वये प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी व त्यापूर्वीच्या वर्षांमध्ये पूर्ण झालेल्या तथापि, नामफलक बसवण्याची कार्यवाही पूर्ण न झालेल्या घरकुलांसाठी योजनेचे नामफलक लावणेबाबत कार्यवाही करावी.
२. **रमाई आवास योजना-** संदर्भ क्र.२ व ४ अन्वये रमाई आवास योजने अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी व त्यापूर्वीच्या वर्षांमध्ये पूर्ण झालेल्या तथापि, नामफलक बसवण्याची कार्यवाही पूर्ण न झालेल्या घरकुलांसाठी योजनेचे नामफलक लावणेबाबत कार्यवाही करावी.

CamScanner

३. **शबरी आवास योजना, पारधी आवास योजना व आदिम आवास योजना-** संदर्भ क्र.३ व ४ अन्वये शबरी आवास योजना, पारधी आवास योजना आणि आदिम आवास योजना अंतर्गत सन २०१६-१७ ते २०२२-२३ पर्यंत पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी योजनेचे नामफलक (परिचय चिन्ह/लोगो) लावणेबाबत कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रमाणे अंमलबजावणी करत असताना कोणत्याही परिस्थीतीत पारदर्शकतेला छेद देणारी बाब करण्यात येवू नये.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलासाठी योजनानिहाय नामफलक (परिचय चिन्ह/लोगो) अनिवार्य केलेले आहे. नामफलकाच्या आनुषंगिक बाबींबाबत संदर्भ क्र.१ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नामफलकाचा आकार १८''X६''X०.५ मिमि असावा. सदर नामफलक G.C./Powder coating मटेरिअलचे असावे. या नामफलकावर लाभार्थीचे नाव, लाभार्थीच्या वडिलांचे / पतीचे नाव, मंजूर वर्ष, गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे नाव तसेच मिळालेले अनुदान व झालेला खर्च इत्यादी माहिती नमूद करण्यात यावी. सदरील नामफलक लावल्यानंतर घरकुल पूर्ण झालेले आहे असे समजण्यात येईल. यासाठी प्रति नामफलक रु.१७५/- इतकी कमाल मर्यादेत रक्कम खर्च करता येऊ शकेल. सदरील खर्च संबंधित योजनेच्या अंतर्गत जिल्हास्तरावर उपलब्ध होणाऱ्या प्रशासकीय खर्चातून भागविण्यात यावा.

**डॉ. राजाराम दिघे**
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत:**

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीसाठी.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

CamScanner

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१
**Email ID : sangeeta.kholgadge@nic.in** दूरध्वनी क्र .०२२-२२०६०५६८

---

क्रमांक :-प्रआयो-२०२१/प्र.क्र.३७/योजना-१० दिनांक:- १६ जून, २०२३.

ज्ञापन :-

शासनाने समक्रमांकाचे दिनांक ०३.०४.२०२३ रोजीचे पत्र निर्गमित केल्यानंतर, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी त्यावर अधिकच्या सूचना असलेले पत्र निर्गमित केले. ज्यातील परिच्छेद-१ मधील १. नुसार काही जिल्हयांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून याबाबत तक्रारवजा निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे. सदर प्रकरणी शासनाचे मा.अपर मुख्य सचिव (ग्रा.वि.व पं.रा.) व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांची चर्चा झाली अंसून मला असे कळविण्याचे निदेश आहेत की, शासन संलग्न कार्यालयातील कोणत्याही पत्रापेक्षा शासनाचा शासन निर्णय प्रभावी ठरतो. सबब, स्पष्ट करण्यात येते की, शासन निर्णय क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.३७/योजना-१०, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ हा स्वयंस्पष्ट असून तदृनुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या योजनेंतर्गत सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षात मंजूर घरकुलांवर नामफलक लावण्याचे कार्य मे.ॲड वे डिझाईन, कोल्हापूर या संस्थेकडून शासन निर्णयातील अटी-शर्तीसह पूर्ण करुन घ्यावेत. ऊर्वरित वर्षांकरिता यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन पत्रांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

पूर्ण झालेल्या घरांवर नामफलक लावून अंतिम झालेल्या घरकुलांची अद्ययावत आकडेवारी उद्दीष्टांसह शासनास वेळोवेळी अवगत करण्यात यावी. सदर शासनाचे आदेश सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.

(मनोज जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,
बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

CamScanner